# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( शिक्षण विभाग )

क्र. /1087/ शि.वि. / 2013. दि. 30 / 09 / 2013.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

प्राथ. / उच्च प्राथ. / माध्य. शाळा, म.न.पा., नागपूर.

विषय :– बालकुमार साधना दिवाळी अंक –२०१३ च्या प्रती खरेदी करणेबाबत.

संदर्भ :– १)मा. राजेंद्र दर्डा, मंत्री शालेय शिक्षण, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, नागपूर यांचे पत्र

२)मा. शिक्षण संचालक, माध्य./उच्च माध्य. शिक्षण संचनालय, म.रा., पूणे –१ यांचे पत्र क्र. शि.स. /१८६४८/अवाहन/२०१३/स. पुस्तक/७१०३ दि. १५/०७/२०१३.

३)मा.प्राथमिक शिक्षण संचालक, म.रा., पूणे –१ यांचे पत्र क्र. प्राशिस/संकीर्ण/५१६ दि. ०५/०८/२०१३.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, साधना साप्ताहिकाची सुरूवात जेष्ठ समाजसेवक व शिक्षण तज्ञ पुज्य सानेगुरूजी यांनी केली होती. सुजाण नागरीक घडण्यासाठी, मुलांमुलींवर शालेय वयातच सुसंस्कार व्हावेत असा त्यांचा कटाक्ष होता. तसेच शालेय वयातच मुल्य जाणीवा व्हाव्यात व वाचन संस्कृत वाढावी यासाठी त्यांनी साधना ट्रस्ट व्दारे मुलांसाठी साधना साप्ताहिक सुरू केले होते. हिच परंपरा मा. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनीही सुरू ठेवली. यावर्षी साधना ट्रस्टच्या वतीने बालकुमार साधना दिवाळी अंकांचे प्रकाशन सप्टेंबर महिन्यात प्रसिध्द होत असून नामवंत लेखकांचे शालेय विद्यार्थ्यासाठी दर्जेदार लेखन असलेला हा अंक शाळेतील मुलामुलींनी घेण्याबाबत आवाहन करण्यात येते.

साधना साप्ताहिकांची परंपरा लक्षात घेवून मा. नामदार राजेंद्र दर्डा, मा. शिक्षण मत्री महोदय, यांनी देखील बालकुमार साधना दिवाळी अंकाच्या उपक्रमास संस्थासंचालक, मुख्याध्यापक, शिक्षक, यांनी सक्रीय प्रतिसाद दयावा असे आवाहन केले आहे. हा दिवाळी अंक फक्त १० रूपयात मिळणार असून जास्तीत जास्त अंक विद्यार्थ्यांकडून खरेदी करण्यात यावी अंक घेणे पूर्णपणे ऐच्छीक असून अंक खरेदीसाठी ९२३ सदाशिव पेठ पूणे ३० दूरध्वनी क्र. (०२०)२४४५१७२४ व E-mail : weeklysadhana@gmail.com या पत्त्यावर परस्पर संपर्क साधता येईल.

शिक्षणाधिकारी,

नागपूर महानगरपालिका नागपूर

PC:2/D:\Tembhurne sir \ Letter 1.doc